**फाईल क्रमांक:- एडीव्ही ३११६/सीआर-६९/२०१९/नऊ** **दिनांक :- ११ ऑगस्ट-२०२०**

# घोषणा

दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) (पूर्व ) परीक्षा -२०२०
(जाहिरात क्र.०१/२०२०)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १ मार्च, २०२० रोजी घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) (पूर्व) परीक्षा -२०२०, चा निकाल दिनांक ११ ऑगस्ट ,२०२० रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

**२.** प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून मुख्य परीक्षेसाठी विहीत मुदतीत अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. तपासणीअंती अपात्र ठरणा-या उमेदवारांची उमेदवारी, आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

३. प्रस्तुत पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुख्य परीक्षेच्या अनुषंगाने अधिसूचना / जाहिरात लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

४. पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरीता स्विकारार्ह आहेत. उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाइन पध्दतीने अर्ज करणे, त्यात परीक्षा केंद्र नमूद करणे व परीक्षा शुल्क विहित मुदतीत भरणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

ठिकाण :- मुंबई

उपसचिव, (परीक्षा-२)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई